# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** कवठेमहांकाळ **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0096 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/03/2021 03:27 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 02/03/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/03/2021

**Time From (वेळेपासून):** 15:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/03/2021 **Time (वेळ):** 03:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/03/2021 03:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 15 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मिरज ते पंढरपुर रोडवर ,जाली बोर्ड हाटेल त्रंबक मध्ये, बोरगाव गावचे हद्दीत ,कवठेमहांकाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जितेंद्र अशोक मंडले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सिध्देश्वर मंदीराजवळ ,शिरढोण,कवठेमहांकाळ ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सिध्देश्वर मंदीराजवळ ,शिरढोण,कवठेमहांकाळ ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9763627695**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत प्रकाश पाटील | | | 1. शिरढोण,कवठेमहांकाळ ,कवठेमहांकाळ, सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी जितेंद्र अशोक मंडले, वय 30 वर्ष व्यवसाय:- शेती रा. सिध्देश्वर मंदीर जवळ, शिरढोण ता.कवठे महांकाळ जि. सांगली मो.नं. 9763627695.वरील ठिकाणी मी माझी पत्नी सौ स्मिता, मुले कार्तीक व हर्ष, आई-वडील, चुलते-चुलत्या असे एकत्रात राहणेस आहे. माझे वडील श्री. अशोक कृष्णा मंडले हे शिरढोण गावचे सरपंच आहेत. मी शेतीच्या व बाहेरील व्यवसायाच्या दृष्टीकोनातून ट्रक्टर ट्रली व इतर अवजारे खरेदी केलेली आहेत. मी माझा सोनालिका ट्रक्टर नंबर एम.एच.10 डी.जी. 3208 हा रोडच्या कामा करीता सुमारे 15-20 दिवसापुर्वी ट्रलीसह लावलेला आहे. सदर ट्रक्टरवर मी आमचे गांवातील बबलू ऊर्फ विक्रम पाटील यांना ड्रायव्हर म्हणुन कामावर ठेवलेले आहे. सद्या माझा ट्रक्टर शितल पाटील कन्ट्रक्टर रा. शिरढोण यांच्याकडे रोडच्या कामा करीता लावला आहे. सदर कामासाठी दि.21.02.2021 रोजी रात्री 10.30 वाजण्याचे सुमारास मी माझा ट्रक्टर ट्रलीसह माझा ड्रायव्हर बबलू पाटील याच्या ताब्यात दिला होता. त्याप्रमाणे रविवारी दि. 21.02.2021 रोजी माझे ट्रक्टर वरील ड्रायव्हर बबलू पाटील हा माझा ट्रक्टर ट्रलीसह त्याच्या राहते घरी तिरमलवाडी ता. कवठेमहांकाळ जि. सांगली या ठिकाणी घेवुन जात असताना सर्कल नागरगोजे, तलाठी सचिन पाटील व कोतवाल यांनी ट्रक्टर धरला असले बाबत ड्रायव्हर बबलू पाटील यांने मला रात्री 11.45 वाजण्याचे सुमारास संपर्क करुन सांगीतले. त्यानंतर मी तात्काळ वस्तीवरुन सदर ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी सर्कल नागरगोजे, तलाठी सचिन पाटील व कोतवाल हजर होते. त्यावेळी मी नागरगोजे सर्कल यांना ट्रक्टर मोकळा आहे का धरलाय असे विचारले असता, नागरगोजे सर्कल यांनी ट्रक्टर वाळु भरायला आला होता, म्हणुन धरला आहे, तुझा ट्रक्टर आम्ही घेवुन जाणार आहे. ट्रक्टर जर सोडायचा असेल तर प्रशांत प्रकाश पाटील यांना फोन कर असे सांगीतले. प्रशांत पाटील हा माझ्या गावचाच असल्याने मी त्याला ओळखतो त्याचा मोबाईल नंबर माझ्याकडे असल्याने मी प्रशांत पाटील यांना संपर्क करुन वरील प्रमाणे हकीकत सांगीतली असता, प्रशांत पाटील हे काही वेळातच ट्रक्टर धरला असले ठिकाणी आले. त्यावेळी प्रशांत पाटील यांची नागरगोजे सर्कल यांचे सोबत चर्चा झाली. त्यानंतर प्रशांत पाटील यांने मला त्यांचे जवळ बोलावुन घेवुन सर्कल साहेबांनी ट्रक्टर सोडणे करीता 1 लाख 25 हजार रुपये मागीतले असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर मी प्रशांत पाटील यांना रक्कम कमी करणे बाबत विनंती केली असता प्रशांत पाटील यांनी मला दंड 1 लाख 60 हजार रुपये होतो, तू 1 लाख 25 हजार रुपये दे, तुझा ट्रक्टर सोडतो नाहीतर तुझ्यावर गुन्हा दाखल करतील गुन्हा दाखल झाल्यास तुझ्या वडीलांचे सरपंच पद धोक्यात येईल असे म्हणाले. त्यावेळी मी प्रशांत पाटील यांना माझ्याकडे एवढी रक्कम नाही असे म्हणलो असता प्रशांत पाटील यांनी मला मी तुला मदत करतो असे म्हणून त्यांचे जवळील 50 हजार रुपये मला दिले व उरलेली रक्कम तुझ्या जवळची घालून सर्कल नागरगोजे यांना द्यावे लागेल असे सांगीतले. त्यानंतर मी भितीपोटी टी.के. ढाब्याचे मालक यांचेकडून 38 हजार रुपये उसणे घेवुन एकुण 88 हजार रुपये प्रशांत पाटील यांचेकडे दिले. त्यानंतर सर्कल नागरगोजे यांनी माझा ट्रक्टर व ट्रली सोडली. त्यावेळी श्री. प्रशांत पाटील यांनी मला उरलेले 37 हजार रुपये उद्या माझ्याकडे दे, मी मंडल अधिकारी नागोरगोजे साहेबांना देतो असे म्हणाले. श्री.नागरगोजे सर्कल यांनी मला माझ्या मोकळ्या ट्रक्टरवर कारवाई



Scanned with CamScanner

केल्यावर गुन्हा दाखल होईल च वडीलांचे सरपंचपद धोक्यात येईल अशी धमकी दिली असल्याने मी नाईलाजास्तव मंडल अधीकारी कार्यालय देशीग येथे जावुन सर्कल श्री. नागरगोजे व प्रशांत पाटील यांचे भेट घेवून रक्कम कमी करणे बाबत चर्चा करणार आहे. परंतू मला सर्कल श्री. नागरगोजे व श्री. प्रशांत पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.01.03.2021 रोजी घाटगे साहेब पोलीस उप अधीक्षक अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचेशी संपर्क साधुन माझा सोनालिका ट्रक्टर नंबर एम.एच.10 डी.जी. 3208 यांचेवर कारवाई न करण्यासाठी सर्कल नागरगोजे यांनी 1,25,000/- रुपयाची मागणी करुन 88,000/-रुपये प्रशांत पाटील खाजगी इसम यांचे करवी घेवून राहीलेले 37,000/- रुपये प्रशांत पाटील, खाजगी इसम यांचेकडे देणेस सांगून 37,000/-रुपयाची लाच मागीतले बाबत त्यांना सांगीतले त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील शासकीय टाटा सुमोचे वर्णन सांगून आमचे पथक दुपारी 12.00 वाजणेचे सुमारास मिरज पंढरपूर रोडवरील जली बोर्ड येथे येत असले बाबत सांगीतले. त्याप्रमाणे दि.01.03.2021 रोजी मी जली बोर्ड जवळ हजर असताना चौगुले साहेब व त्यांचा स्टाफ असे शासकीय टाटा सुमोने तेथे आले. त्यावेळी मी त्यांचे जवळ जावून माझी ओळख सांगून लाच मागणी संदर्भात मीच अन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, सांगली येथे फोन करुन कळवीलेचे सांगीतले त्यावेळी चौगुले साहेब यांनी त्यांचे कडील टाटा सुमोमध्ये बसणेस सांगून त्यांनी मला त्यांची व सापळा पथक यांची ओळख करुन दिली. त्यानंतर चौगुले साहेब यांना मी माझी सर्कल नागरगोजे व संदीप पाटील यांचे विरुध्द लाचमागणीची तक्रार असले बाबत सांगीतले. चौगुले साहेब यांनी मला लाच मागणीच्या तक्रारीचा अर्ज देणे बाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी त्यांना माझा लाचमागणीचा तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर चौगुले साहेब यांनी सापळा पथका व्यतीरिक्त दोन हजर असले अनोळखी व्यक्तीची पंच म्हणून ओळख करुन दिली. त्यानंतर चौगुले साहेबांनी सदर कारवाईसाठी श्री.राजु समशेर पखाली यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. शिवाजी राजाराम जाधव, यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.त्यानंतर चौगुले साहेबांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची तक्रार थोडक्यात कथन केली. त्यानंतर चौगुले साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर तक्रारी अर्ज वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सहा केल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर व नवीन मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच श्री पखाली यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला व पंच पखाली यांना ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकसेवक श्री नागरगोज, मंडल अधीकारी यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी, व पंच पखाली असे माझेकडील मारुती सुझुकी आल्टो क्रमांक एमएच 10 सीएक्स 4123 मधुन मंडल अधिकारी यांची मंडल अधिकारी कार्यालय, देशिंग येथे जावुन भेट घेण्याकरीता माझे कारने रवाना झालो. आम्ही बोरगाव ते देशिंग जाणारे रोडवरील कोळेकर बंगला येथे आलो असता माझे वरील कारमधील पेट्रोल संपल्याने सदर ठिकाणी कार बंद पडली म्हणुन मी माझा मित्र अमित ऊर्फ चिनु कुंभार याला फोन करून त्याची मोटारसायकल क्रमांक. एम.एच.13.ए.एच.8263 ही सदर ठिकाणी बोलावुन घेतली व मित्र अमित यास माझे अल्टो गाडीमध्ये बसण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच पखाली असे दोघेजण मोटारसायकल वरून सदर ठिकाणावरून रवाना होवुन मंडल अधिकारी कार्यालय देशिंग या ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी मी मोटारसायकल पार्क केली. त्याठिकाणी प्रशांत पाटील हजर होता. त्यानतर मी प्रशांत पाटील याला सासरे आत्यात फास लावुन घ्यायची बारी आलीया मला साहेबांना भेटायचं आहे असे म्हणालो. त्यावर प्रशांत पाटील मला तुला सांगु का मी साहेबांच्या नरड्याला फास, भेटु देत नाहीत असे म्हणाला. त्यावर मी तुच सांग मोकळा ट्रक्टर हाय भरलेला असता तर ठीक हाय असे म्हणालो त्यावर प्रशांत पाटील हा साहेब फोन बी करू नका म्हणत्यात, जा भेटुन ये जा. असे म्हणाला. त्यावर मी दोघं जावुन येवुया की चल असे म्हणालो असता प्रशांत पाटील मला आरं ती भ्यायला लागल्याती असे म्हणाला, त्यानंतर मी, प्रशांत पाटील व पंच पखाली असे चालत चालत जिन्याद्वारे दुसया मजल्यावर मंडल अधिकारी बसता त्या ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी मंडल अधिकारी नागरगोजे हे बसलेले होते. मी त्यांना साहेब, असे म्हणालो. त्यावर प्रशांत पाटील हे मला बोल पटदिशी असे म्हणाले. त्यावर मी पाटील याला सोनं गहाण करून देणार हाय ट्रक्टर मोकळा हुता असे म्हणालो त्यावर नागरगोजे हे ट्रक्टर मोकळा आणुन लावला तुम्ही काय आमच्यावर अलीकेशन करताय काय? तसलं सांगायचं नाही आम्हाला. ज्या त्या वेळेला विषय करायचा असतोय. परत येवु नको माझ्यासमोर, तुझी लायकी कळाली. गरीबांना मदत करायची काय, रोडवर उभा करायचं असे म्हणाले त्यावर मी देतोय की साहेब असे म्हणालो असता मंडल अधिकारी नागरगोजे हे मला पहिल्यांदा उठायचं माझ्यासमोरून, जा तु असे म्हणालेने मी प्रशांत पाटील व पंच पखाली असे मंडल अधिकारी यांचे केबीनमधुन बाहेर आलो त्यावेळी प्रशांत पाटील हा मला ऐक माझं तुम्हाला आता सोप्यावारी सोडलंय म्हणुन काय वाटना सोडलं नसतं म्हणजे तुम्हाला कळलं असतं काय विषय हाय असे म्हणाला त्यावर मी देतो म्हणलंय की न्हाय काय जरा कमी करायला सांग ट्रक्टर मोकळा होता तुला माहिती हाय असे म्हणालो त्यावर प्रशांत पाटील हा मला माझं दोन मिनिटं ऐक वाटलं तर माझे पैशे कमी दे मी मध्यस्थी झालोय डोक्याला ताप नको माझ्या असे म्हणाला त्यावर मी प्रशांत पाटील याला तुला बायकोचं सोनं मोडुन सोनं देणार हाय असे म्हणालो त्यावर प्रशांत पाटील हा मला मी काय सांगतोय माझे पन्नास हजार रूपये देवु नको बुडु दे त्याच्या आयला कुत्रा लाव मी एकदाची अक्कल विकत घेतली मदत करून, चार दिवस रेंगाळलय बरं का पन्नास मी आणलेत लग्नातले , बाबु ने अडतीस चाळीस पण अडतीस रडुन आणलेले कश शिवाय विषय होत न्हाय माझ्या खिशात पैसे होत व्हय रं असे म्हणाला. त्यावर मी सगळ्यांना दिल्यात काय असे विचारले असता, त्याने संगळ्याना दिले असल्याचे सांगीतले. त्यावर मी पाटील याला तुला देतो सगळ असे म्हणालो. त्यावर पाटील मला ट्रक्टर सोडला नसता तर तिथ गंजूनच ट्रक्टर आणायचा होता असे म्हणाला. त्यावर मी त्याना किती पाहीजे बघ किती म्हणतात ते त्यावर पाटील मला त्याला सव्वा लाख द्यायला लागतील त्यामधील बाबुचे अडतीस आणि माझे पन्नास असे एकुण 88 हजार रुपये माझेकडे पोच झाल्यात असे म्हणाला. त्यावर मी पाटील याला तुझ देतो थोडया वेळान त्यावर पाटील दे की आता हिशोब कर की लेका असे मला म्हणाला. त्यावर मी तासाभरान सोन गहाण ठेवुन आणुन देतो असे म्हणालो. त्यावर पाटील हा मला दहा हजार रुपये कमी दे मला असे म्हणाला. त्यानंतर मी पाटील याला तेल टाकुन येतो असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच पखाली असे मोटर सायकलवरुन तेथून रवाना होवून चौगुले साहेब थांबले ठिकाणी आलो.त्यावेळी चौगुले साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. चौगुले साहेब यांनी पंच पखाली यांना घडलेली हकीकत विचारली असता पंच पखाली यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी व्हाईस रेकर्डर मधील पडताळणी कारवाई दरम्यान झालेले संभाषण ऐकले. तक्रारदार यांचेकडे मंडल अधीकारी नागरगोजे यांनी लाच रक्कमे संदर्भात बोलणे झाले नाही, परंतु खाजगी इमस प्रशांत पाटील यांने लोकसेवक मंडल अधीकारी नागरगोजे यांचे करीता लाचेची मागणी केलेने पुन्हा तक्रारदार यांना पडताळणी करता मंडल अधीकारी नागरगोजे यांचेकडे पाठवण्याचे सर्वानूमते ठरले. त्यानंतर मी कुंभार यांची मोटर सायकल कुंभार यांस देवून माझे अल्टो कारमध्ये पेट्रोल भरुन चौगुले साहेब थांबले ठिकाणी आलो. त्यानंतर चौगुले साहेब यांनी पुन्हा एकदा मला व पंच यांना डिजीट व्हाईस रेकर्डर बाबत माहिती देवून सुचनाची उजळणी करुन डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकड



Scanned with CamScanner

13. Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): AAPASAHEB SHANKAR KOLI(I (Inspector)) / PSMH24815 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): AAPASAHEB SHANKAR KOLI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PSMH24815

PN1898
ठाणे अंमलदार
कवठेमहांकाळ पोलिस ठाणे
जि.सांगली.

Scanned with CamScanner